अहिल्यानगर जिल्हा परिषद, अहिल्यानगर
प्राथमिक शिक्षण विभाग
पत्ता – पहिला मजला नवीन प्रशासकिय इमारत, माळीवाडा बस स्टॅण्ड समोर,
अहिल्यानगर - ४१४ ००१ दुरध्वनी क्रमांक -०२४१ २३५३६९४

मध्यवर्ती टपाल कक्ष (CRU) Email – khamkar.pramod@mah.gov.in
शिक्षण विभाग प्राथमिक (CRU) Email – jayshree.shinde42@mah.gov.in
संकेतस्थळ - www.nagarzp.gov.in संकेतस्थळ - www.eduprimaryanagar.in


**जा.क्र.शिक्षण/कार्या-2/आस्था-3/221/2026** **अहिल्यानगर दिनांक- 15/04/206**

**विषय - अधिक्षक शालेय पोषण आहार पारनेर या पदाचा कार्यभार सोपविणे बाबत.**

संदर्भ : - 1. म.जि.प.प.स.अधिनियम1961 मधील नियम 95 (2)(क)(तीन)
2.मा.शिक्षण सहसंचालक(प्रशासन अंदाज व नियोजन),शिक्षण आयुक्तालय पुणे यांचे कडील पत्र कमांक आशिका/आस्था-अ/टे.क्र.101/2026/1837132 दिनांक 09/04/2026

**-: आदेश :-**

वरील संदर्भिय विषयान्वये आदेशीत करण्यात येते की,श्री.वैभव चंद्रकांत दुर्गाडे,अधिक्षक शालेय पोषण आहार पारनेर या पदावर दिनांक 01/04/2026 रोजी हजर झालेले आहेत. मा.शिक्षण सहसंचालक (प्रशासन अंदाज व नियोजन),शिक्षण आयुक्तालय पुणे यांचे कडील पत्र कमांक आशिका/आस्था-अ/टे.क्र.101/2026/1837132 दिनांक 09/04/2026 अन्वये श्री.वैभव चंद्रकांत दुर्गाडे अधिक्षक शालेय पोषण आहार,पारनेर यांना राज्यातील अपात्र शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचा-यांची नावे शालार्थ प्रणालीमध्ये नियमबाहय रित्या समाविष्ट करुन वेतन अदा केल्यासंदर्भात विशेष चौकशी पथक (S.I.T.) स्थापन करण्यात आली आहे. शासन निर्णयात नमूद केलेनुसार विशेष चौकशी पथकाची कार्यकक्षा ठरविण्यात आली आहे.

सदर कामी श्री.वैभव चंद्रकांत दुर्गाडे,अधिक्षक शालेय पोषण आहार पंचायत समिती पारनेर यांची तात्पुरत्या स्वरुपात उसनवारी तत्वावर सेवा सेवा उपलब्ध करुन घेणे बाबत मा.शिक्षण आयुक्त यांनी दिनांक 23.03.2026 चे टिपणी नुसार मान्यता दिली आहे. श्री.वैभव चंद्रकांत दुर्गाडे, अधिक्षक शालेय पोषण आहार,पंचायत समिती,पारनेर यांची सेवा विशेष चौकशी पथक (S.I.T.) कामकाज करणेकरीता उसनवारी तत्वावर पुढील आदेश होईपर्यंत वर्ग करुन घेण्यात आली आहे.सदर कामी हजर होण्यासाठी दिनांक 15/04/2026 रोजी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे.

प्रशासकीय कामकाजाचे सोईचे दृष्टीने म.जि.प.व पं.स.अधिनियम 1961 मधील कलम 95 (2) (तीन)(तीन-क) नुसार मला प्रदाण करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन नियमित शालेय पोषण आहार अधिक्षक हजर होईपर्यंत अथवा पुढील आदेश होईपर्यंत पारनेर पदाचा तात्पुरत्या स्वरुपात अतिरिक्त कार्यभार श्री.विनेश मारुती लाळगे,विस्तार अधिकारी (शिक्षण) पंचायत समिती पारेनर,जि.अहिल्यानगर यांचे कडे सोपविण्यात येत आहे.

तरी संबधिताने आपले मुळ पदाचे कामकाज पाहून अधिक्षक शालेय पोषण आहार या पदाचे कामकाज करावे.प्रकरणी तक्रार उद्भवणार नाही याची गांभिर्याने दक्षता घ्यावी.अधिक्षक शालेय पोषण आहार पदाचा कार्यभार संबधिताकडून हस्तांतरीत करुन घेऊन आदेशानुसार तात्काळ अंमलबजावणी करावी.केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ या कार्यालयास विनाविलंब सादर करावा.सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक 202604151600441--------------असा आहे.

**आनंद भंडारी,(भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

प्रति,

**श्री.विनेश मारुती लाळगे, विस्तार अधिकारी (शिक्षण) पंचायत समिती पारेनर,जि. अहिल्यानगर**

प्रत- माहिती व पुढील कार्यवाहीस्तव रवाना.

1.गट विकास अधिकारी पंचायत समिती ता. पारनेर जि. अहिल्यानगर

2.गट शिक्षण अधिकारी पंचायत समिती ता. पारनेर जि. अहिल्यानगर

**स्वाक्षरी/-**
**आनंद भंडारी,(भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**